राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टिलाइजर्स लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम )
( प्रशासकीय भवन, चेंबूर, मुंबई - 400 074.)

## कंपनीच्या ट्रॉम्बे व थळ युनिटमध्ये खाली नमुद केलेल्या पदाकरीता कुशल व योग्य पुरूष उमेदवार पाहिजेत.

I) 1. पदाचे नाव : बॉयलर ऑपरेटर श्रेणी **III** (A5)
2. वेतनश्रेणी : रू.**8650-19000**
3. पदांची संख्या : **10** (7 सामान्य, 1 अनु.जाती व 2 इतर मागासवर्गीय)
4. वय (दिनांक 01.04.2017 रोजी) : किमान वय 18 वर्ष व कमाल वय 30 वर्ष (सामान्य वर्ग)
**5.** शैक्षणिक पात्रता : एस. एस. सी. उत्तीर्ण व शासनाकडून देण्यात आलेले द्वितीय वर्गाचे बॉयलर अटेंडंट कॉम्पिटन्सी प्रमाणपत्र.
**6.** कामाचा अनुभव : किमान 2 वर्षाचा अनुभव, ज्यात बॉयलर सुरू करणे व त्याचे प्रचालन करणे, बॉयलर सुस्थितीत ठेवणे व त्याची देखरेख करणे, बॉयलरला नियमित वंगण देणे इत्यादीचा समावेश असेल (अनुभव प्रमाणपत्र आवश्यक).
कामाचा अनुभव द्वितीय वर्गाचे बॉयलर अटेंडंट कॉम्पिटन्सी प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतरच्या काळातील असला पाहीजे.

अंशकालीन / पत्रव्यवहार / डीस्टन्स लर्नींग / इ-लर्नींग इत्यादी द्वारे शैक्षणिक पात्रता धारण केलेले उमेदवार वरील पदाकरीता अर्ज करण्यास अपात्र ठरतील.

सरकारी निर्देशानुसार ज्या पदांमध्ये राखीव जागा घोषित आहेत त्या प्रवर्गासाठी खालील प्रमाणे वयामध्ये शिथिलता देण्यात येईल.

- अनुसूचित जाती व इतर मागासवर्गीयांसाठी अनुक्रमे 5 वर्षे व 3 वर्षे.
- 1984 च्या दंगलग्रस्त मुले व कुटुंबियांसाठी 5 वर्षे.
- माजी सैनिकांसाठी सरकारी निर्देशासानुसार.
- वरील पद दिव्यांगजन उमेदवारांच्या भर्तीसाठी आयडेंटीफाईड नाही.

II) निवडीची पद्धत :

वरील निकषाची पूर्तता करणा-या पात्र उमेदवारांना ई-मेल अथवा पत्राद्वारे लेखी परीक्षेस बोलविण्यात येईल. 100 गुणांची लेखी परीक्षा वस्तुनिष्ठ प्रश्न स्वरूपात, सामान्य ज्ञान, इंग्रजी, बुद्धीचातुर्य, व्यावहारिक ज्ञान, व बॉयलर विषयाचे ज्ञान यावर आधारीत असेल. गुणवत्ता पात्रतेकरीता लेखी परीक्षेमध्ये अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील उमेदवारांना किमान 45% गुण व अन्य प्रवर्गातील उमेदवारांना किमान 50% गुण मिळविणे आवश्यक आहे. लेखी परीक्षेच्या आधारावर पदांच्या वर्गवारीची (**1:2** प्रमाणात) गुणवत्ता यादी तयार केली जाईल. या यादीतील वर्गनिहाय गुणवत्ता क्रमांकानुसार एकूण दहा उमेदवारांची अंतिम निवड केली जाईल व अन्य उमेदवारांची वर्गनिहाय गुणवत्ता क्रमांकानुसार प्रतिक्षा यादी तयार केली जाईल.

...2/-

अंतिम निवड झालेल्या उमेदवारांची वैद्यकीय चाचणी करण्यात येईल. वैद्यकीय चाचणीत पात्र ठरलेले उमेदवार बॉयलर ऑपरेटर श्रेणी **III** (A5) या पदावर नियुक्ती करीता पात्र ठरतील. निवड झालेल्या उमेदवारांची नेमणूक ट्रॉम्बे अथवा थळ युनिट येथे आवश्यकतेनुसार करण्यात येईल.

III) **<u>नियुक्ती आणि अन्य लाभ</u>** :

अंतिम निवड झालेल्या उमेदवारांची वेतनश्रेणी रू.**8650-19000** मध्ये बॉयलर प्रचालक श्रेणी **III** (A5) या पदावरती नियुक्ती करण्यात येईल. मूळ वेतन, महागाई भत्ता व कंपनीच्या नियमानुसार वेळोवेळी लागू असलेले अन्य भत्ते व इतर सुविधा देण्यात येतील.

## <u>अर्ज कसा करावा</u> :

अनुसूचित जाती / अनुसूचित जमातीच्या प्रवर्गातील उमेदवारांकरीता अर्ज शुल्क आकारण्यात येणार नाही. सामान्य व इतर मागासवर्गीय उमेदवारांना रू.100/- अर्ज प्रक्रिया शुल्क आपल्या जवळच्या स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेमध्ये जमा करावे लागेल. शुल्क रक्कम ठराविक खात्यात जमा व्हावी म्हणून कंपनीच्या **www.rcfltd.com** हया वेबसाईटवरील रिक्रुटमेंट सेक्शन क्लिक करून चलनाचे प्रिंट घेऊन जवळच्या स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेमध्ये अर्ज शुल्क जमा करावे. अर्ज शुल्क जमा झाल्यानंतर बँक उमेदवाराला एक जरनल क्रमांक व ब्रांच कोड देईल. हा जरनल क्रमांक गोपनीय ठेवावा. जर उमेदवाराने चुकीच्या खात्यात शुल्क जमा केले तर त्यास आर.सी.एफ. जबाबदार असणार नाही. अर्ज शुल्क अन्य कुठल्याही स्वरूपात स्वीकारले जाणार नाही. अर्जासोबत एस.बी.आय. चलनाची प्रत जोडण्यात यावी. वरील अर्ज प्रक्रिया शुल्क कुठल्याही कारणास्तव परत करण्यात येणार नाही.

सोबत दिलेल्या विहित नमुन्यामधील अर्जासोबत अर्ज प्रक्रिया शुल्क **'राष्ट्रीय** केमिकल्स ॲण्ड फर्टिलायझर्स लिमिटेड**'**('Rashtriya Chemicals & Fertilizers Limited') <u>खाते क्र. 32376431341(Account No.32376431341)</u> मध्ये वरीलप्रमाणे रू.100/- जमा केल्यानंतर मूळ चलान प्रत जोडून अर्ज सहाय्यक महा व्यवस्थापक (मानव संपदा) रूम नं. 06, तळ मजला, **राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टिलायझर्स लिमिटेड, प्रशासकीय भवन**, **चेंबूर**, **मुंबई** - 400 074 या पत्त्यावर पाठवावा. <u>अर्जासोबत वयाचा दाखला, शालांत परीक्षा उत्तीर्णतेचे प्रमाणपत्र, गुणपत्रक, द्वितीय वर्गाचे बॉयलर अटेंडंट कॉम्पिटन्सी प्रमाणपत्र, गुणपत्रक व कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र (Certificates) यांच्या स्वयं प्रमाणित (Self attested) प्रती जोडणे आवश्यक आहे.</u> कृपया अर्ज भरण्यापूर्वी खालील माहिती काळजीपूर्वक वाचावी.

**<u>अर्ज स्विकारण्याची शेवटची तारीख 9 जून, 2017 आहे.</u>**

## <u>सर्वसाधारण सूचना</u>

1) निवड झालेल्या उमेदवारांना वैद्यकीय चाचणी व रूजू होण्याची तारीख, वेळ व ठिकाणाबद्दल त्यांनी अर्जात दिलेल्या पत्त्यावर पत्राद्वारे किंवा ई-मेलद्वारे कळविण्यात येईल.

2) लेखी परीक्षा मुंबई येथे आयोजित केली जाईल. लेखी परीक्षेला पात्र व उपस्थित राहणा-या उमेदवारांना नजीकच्या मार्गाचा नॉन एसी बस / ट्रेनचा दुस-या वर्गाचा प्रवास खर्च (येता-जाता) देण्यात येईल. हा प्रवास खर्च फक्त लोकल ट्रेनच्या मर्यादेपलिकडे राहणा-या उमेदवारांना देण्यात येईल. प्रवास खर्चाच्या प्रतिपूर्ततेकरीता उमेदवारांना बस / ट्रेनचे तिकीट सादर करणे अनिवार्य आहे.

3) चुकीचा / अपूर्ण पत्ता, अवैध ई-मेल पत्ता तसेच उमेदवार दिलेल्या पत्त्यावर राहत नसल्याकारणांनी पत्र/ई-मेल न मिळाल्यास / उशिरा मिळाल्यास कंपनी जबाबदार राहणार नाही. अपूर्ण, स्वाक्षरी न केलेले, विहीत नमुन्यात न भरलेले व चलान न जोडलेले अर्ज तसेच जातीचे प्रमाणपत्र, शैक्षणिक पात्रता व अनुभव प्रमाणपत्र, यांच्या स्वयं प्रमाणित प्रति नसलेले आणि अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम तारखेनंतर आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत व या संबंधीचा कोणत्याही स्वरूपाचा पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

4) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीय या संदर्भात विहीत नमुन्यात सक्षम प्राधिका-यांनी जारी केलेले प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. विहीत नमुने अनुलग्नक 'ए' व 'बी' मध्ये जोडण्यात आले आहेत. इतर मागासवर्गीय उमेदवार नॉन क्रिमी लेयर गटात मोडत असल्यास दिनांक 01.04.2017 रोजी वैध असलेले सक्षम प्राधिका-यांनी निर्गमित केलेले प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती / इतर मागासवर्गीय अर्जदारांनी जाती वैधता प्रमाणपत्राची **(Caste Validity Certificate)** स्वयं प्रमाणित प्रत जोडावी अथवा त्यासाठी केलेल्या अर्जाच्या पावतीची स्वयं प्रमाणित प्रत जोडावी.

5) अर्ज पाठविताना पाकीटावर डाव्या बाजूला बॉयलर प्रचालक श्रेणी III (A5) पदासाठी अर्ज असे स्पष्ट लिहावे.

6) अर्ज पाठविण्याची मुदत संपल्यानंतर उमेदवाराचा कुठल्याही स्वरूपाचा पत्र व्यवहार अथवा दूरध्वनी विचारात घेतला जाणार नाही.

7) निवड झालेल्या उमेदवारांना वैद्यकीय चाचणी द्यावी लागेल.

8) निवड, भरतीसंबंधीचा कंपनीचा निर्णय अंतिम असेल आणि कोणत्याही उमेदवाराशी हया भरती संबंधी वैयक्तिक पत्र व्यवहार केला जाणार नाही.

9) भरतीसंबंधीची ही जाहीरात कोणत्याही कारणांमुळे पूर्णपणे किंवा अंशतः रद्द / त्यामध्ये बदल करण्याचा कंपनीस अधिकार राहील आणि हा निर्णय उमेदवारास कळविणे कंपनीवर बंधनकारक राहणार नाही.

**<u>अर्ज स्विकारण्याची शेवटची तारीख 9 जून, 2017 आहे.</u>**

सहाय्यक महा व्यवस्थापक (मानव संपदा)
दूरध्वनी क्र. 022 25522705
022 25522885

## अर्जाचा नमुना

संदर्भ : वृत्तपत्र जाहीरात दिनांक _______/ वृत्तपत्राचे नाव

कृपया पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवा

पदाचे नाव :

पूर्ण नाव :

| आडनाव | नाव | वडीलांचे नाव |
|---|---|---|
| | | |

जन्म दिनांक :

| दिनांक | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

दिनांक 01.04.2017 रोजी पूर्ण वय :

| वर्ष | महिने |
|---|---|
| | |

वैवाहिक स्थिती :

लिंग : पुरूष

पत्रव्यवहारासाठीचा पत्ता :

पिन कोड :

टेलिफोन / मोबाइल नंबर :

ई-मेल अॅड्रेस :

अधिवासी राज्य :

धर्म :

अनुसूचित जात / अनुसूचित जमाति / इतर मागासवर्गीय / सामान्य :

इतर मागासवर्गीय असल्यास नॉन क्रिमी लेयर गटात मोडत असल्यास दिनांक 01.04.2017 रोजी वैध असलेले प्रमाणपत्र आहे का ? आहे / नाही

1984 च्या दंगलग्रस्त मुले व कुटुंबीय आहात का ? आहे / नाही

शैक्षणिक पात्रतेचा तपशील (दिनांक 01.04.2017 रोजी) :

| परीक्षेचे नाव | मुख्य विषय | टक्केवारी | बोर्ड | परीक्षा उत्तीर्ण होण्याचे वर्ष | अभ्यासक्रम पूर्ण वेळ / अर्ध वेळ |
|---|---|---|---|---|---|
| एस.एस.सी. | | | | | |
| बॉयलर अटेंडंट कॉम्पिटन्सी प्रमाणपत्र | | | | | |
| अन्य (असल्यास ) तपशील द्यावा. | | | | | |

2/-

अनुभवाचा तपशील ( दिनांक 01.04.2017 रोजी ):

| संस्थेचे / कंपनीचे नाव | प्रशिक्षणार्थी / नियमित सेवा | पद | अनुभवाचा कालावधी ( प्रशिक्षण कालावधी अनुभव म्हणून गणला जाणार नाही ) ( दिवस / महिने / वर्षे ) | |
|---|---|---|---|---|
| | | | पासून | पर्यंत |
| | | | | |
| | | | | |

सेवायोजन रजिस्ट्रेशन नं. व प्रत जोडली आहे का ? : आहे / नाही ( असल्यास रजिस्ट्रेशन नं.)

छंद / कला गुण :

बँकेचे चलान जोडले आहे का ? असल्यास :

चलान मधील जरनल क्रमांक :

चलानची तारीख :

| **भाषा पर्याय** | **मराठी** | **हिंदी** | **इंग्रजी** |
|---|---|---|---|
| लेखी परीक्षेच्या भाषेच्या पर्यायाकरीता समोर दिलेल्या रकान्यात √ अशी खूण करावी. | | | |

<u>वचन</u>

मी याद्वारे जाहीर करतो / करते की वर दिलेली माहिती माझ्या ज्ञानाप्रमाणे खरी आहे आणि खोटी माहीती दिल्यास माझी उमेदवारी अपात्र ठरेल हयाची मला पूर्ण जाणीव आहे.

( उमेदवाराची सही )

दिनांक :
स्थळ :
प्रति :
सहा. महा व्यवस्थापक (मानव संपदा)
आर.सी. एफ. लि.,
प्रशासकीय भवन, रूम. नं. 6, तळमजला,
चेंबूर, मुंबई.

संलग्न :

1. एस.एस.सी. उतीर्ण गुणपत्रिका व एस.एस.सी. उतीर्ण प्रमाणपत्र ( ).
2. द्वितीय वर्गाचे बॉयलर अटेंडंट कॉम्पिटन्सी प्रमाणपत्र ( ).
3. जन्म दाखला किंवा एस.एस.सी. उत्तीर्ण प्रमाणपत्र ( ).
4. जाती प्रमाणपत्र व जाती वैधता प्रमाणपत्र ( ).
5. इतर मागासवर्गीय उमेदवार नॉन क्रिमी लेयर गटात मोडत असल्यास दिनांक 01.04.2017 रोजी वैध असलेले सक्षम प्राधिका-यांनी निर्गमित केलेले प्रमाणपत्र ( ).
6. बँकेचे चलान लागू असल्यास ( ).

सूचना :

- कृपया अर्जासोबत संलग्न केलेल्या फोटो कॉपी (स्वयं प्रमाणित) समोर दिलेल्या कंसात अशी (√) खूण करावी.
- कृपया अर्जासोबत गुणपत्रिका व उत्तीर्ण प्रमाणपत्र इत्यादीच्या **मूळ** प्रति (Original copies) पाठवू **नयेत.**